- 3 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फुले-आंबेडकरांच्या कार्याचा महर्षी शिंदे दुवा

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. पुष्पा भावे यांचे प्रतिपादन : रा.ना.चव्हाण लिखित ग्रंथाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सनातनचे मुख्य केंद्र असलेल्या वाई येथून अस्पृश्यता निवारण्याचे काम सुरू केले. त्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामाचा पायाच त्यांनी तयार केला होता. तरीही समाजापासून ते दुर्लक्षीत राहिले. विठ्ठल रामजी शिंदे हे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील दुवा होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. पुष्पा भावे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन केंद्राच्यावतीने महर्षी विठ्ठल शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन, भाग-२' या ग्रंथाचे प्रकाशन भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते झाले. हा कार्यक्रम विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात पार पडला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, डॉ. गो. मा. पवार, सुजाता पवार, निवृत्त एअर कमांडर अशोक शिंदे, रमेश चव्हाण यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवली.



कोल्हापूर : महर्षी विठ्ठल शिंदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन, भाग-२' या ग्रंथाचे प्रकाशन करताना भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. सोबत डॉ. राजन गवस, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. पुष्पा भावे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सुजाता पवार, डॉ. गो. मा. पवार, अशोक शिंदे, डॉ. रणधीर शिंदे.

डॉ. भावे म्हणाल्या, विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्यता निवारणाबरोबर शेतकरी परिषदांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले. स्त्रीयांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात यावे आणि काम करावे यासाठी ते आग्रही होते. तसेच समाजकारण, शिक्षण व राजकारणात भरीव कामगिरी केली. स्वत: ठरवलेल्या तत्वानुसार आपला जीवनप्रवास केला.

कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, महर्षी शिंदे हे द्रष्टे विचारवंत होते. विचारांची स्पष्टता, निर्मळ सहृदयता या गुणांसह मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी कार्य केले. त्यांच्याविषयीच्या ग्रंथातून समाज इतिहासाचा आदर्श वस्तुपाठ प्रदर्शित झाला आहे. आज जगभरात नैतिक, भौतिक मूल्यांचा ऱ्हास होत असताना त्यातून मूल्यव्यवस्था प्रस्थापनेच्या दृष्टीने महर्षी शिंदे यांच्यावरील ग्रंथ पथदर्शक ठरेल.

मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ नेते डॉ. एन.डी. पाटील, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, महर्षी शिंदे यांच्या नात सुजाता पवार, पणतू राहुल पवार, डॉ. रणधीर शिंदे, आनंद भावे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, रमेश शिपूरकर, डॉ. टी.एस. पाटील, सुश्मिता खुटाळ, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

### बहुजनांना नेतृत्व नाही

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अस्पृश्यता निवारणाची मोठी चळवळ झाली. सध्या मात्र बहुजनांना नेतृत्वच उरलेले नाही. सध्याच्या परिस्थितीत एका विचारावर कोणी ठाम नाही, तर परिस्थितीनुसार विचारात बदल करणाऱ्या नेत्यांची संख्या वाढली आहे. धर्मांतर करून अस्पृश्यता निवारण होत नाही. त्यासाठी कृतीची गरज आहे. त्यामुळेच बहुजनांचे नेतृत्व करणारा कोणीच नाही.

3 JAN 2018
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा गुगलशी होणार करार

## विद्यार्थ्यांना खुल्या होणार जागतिक पातळीवरील संधी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** मोबाईल ॲपसह ॲंड्राईड प्रणालीबाबतचे नवनवीन संशोधन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात नववर्षात 'गुगल'च्या सहकार्याने अद्ययावत प्रयोगशाळा साकारण्यात येणार आहे. त्यासाठी गुगलतर्फे विद्यापीठातील १०० प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, हे प्राध्यापक विद्यार्थ्यांना पुढील काळात प्रशिक्षित करणार आहेत.

या महिन्यात 'गुगल' कंपनीसोबत करार करण्यात येणार आहे. या कराराचा मुख्य उद्देश हा संगणकशास्त्राच्या प्राध्यापकांना मोबाईल ॲप, नेव्हिगेशन, ॲंड्राईड प्रणाली आदी सुविधांबाबतचे तंत्रज्ञान, संशोधनाबाबत प्रशिक्षण देणे, या प्राध्यापकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक गुगलच्या उत्पादनांबाबत प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनवणे असा आहे. या कराराच्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१७ पासून विद्यापीठातर्फे काम करण्यात आले आहे. विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागाने प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांसाठी गुगल पुरस्कृत 'ॲंड्राईड फंडामेंटल डेव्हलपमेंट' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळा दोन वेळा घेतली आहे. त्यामध्ये गुगलच्या तंत्रज्ञांनी शंभर प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले आहे.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाने 'मास्टर्स इन कॉम्प्युटर सायन्स'मध्ये ॲंड्राईड प्रणालीच्या मूलभूत घटकांबाबतचा ६० तासांचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याची सुरुवात विद्यापीठाच्या या वर्षीच्या दुसऱ्या सत्रापासून झाली असून, यासाठी ६० विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. या अभ्यासक्रमासाठी व्हिडिओ ट्युटोरियल्स, पुस्तके असे विविध शैक्षणिक साहित्य 'गुगल'ने उपलब्ध करून दिले आहे. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून विद्यापीठातील संगणकशास्त्रातील डॉ. कविता ओझा काम पाहत आहेत. करारातील पुढील टप्प्यात विद्यापीठात ॲंड्राईड प्रणालीबाबतच्या नवनवीन संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा साकारण्यात येणार आहे. त्यासह विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागामधील १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

### विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढणार

गुगलकडून यापूर्वीच प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्यात



आले आहे. पुढील काळात हे प्राध्यापक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार आहेत. गुगलला एकूण ३ लाख प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. विद्यापीठाकडून प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुगलच्या माध्यमातून जागतिक पातळीवरील संधी उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर त्यांच्या कौशल्यांमध्येही वाढ होणार आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के,**
प्र-कुलगुरू

3 JAN 2018 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा 'गुगल'शी करार

## जागतिक दर्जाचे शिक्षण : कौशल्य रोजगाराचा प्रयत्न

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २ : स्मार्टफोनवरील मोबाईल ॲप आणि अँड्रॉईड प्रणालीवर संशोधन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने एक पाऊल पुढे टाकले आहे. नवीन वर्षात जागतिक दर्जाच्या गुगल संस्थेच्या सहकार्यातून अद्ययावत प्रयोगशाळा सुरू केली जाईल. याबाबत गुगल संस्थेशी सहयोगी करार केला जाणार आहे. यातून विद्यार्थ्यांना रोजगार व कौशल्य देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न राहील.

गुगल संस्था इंटरनेटशी निगडित सेवा व आधुनिक तंत्रज्ञान पुरविते. या कंपनीशी करार करण्याचा विद्यापीठाचा मुख्य हेतू म्हणजे संगणक शास्त्राच्या प्राध्यापकांना मोबाईल ॲप, नेव्हिगेशन अँड्रॉईड प्रणाली यांसारख्या सुविधांचे प्रशिक्षण देणे हा आहे. या प्राध्यापकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक गुगलच्या उत्पादनांबाबत प्रशिक्षण देऊन रोजगार उपलब्ध करून देणे, हा आहे. त्या अनुषंगाने तीन महिन्यांपासून विद्यापीठाकडून कराराच्या अनुषंगाने काम सुरू झाले आहे. विद्यापीठात संगणकशास्त्र अधिविभागाने प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी गुगल पुरस्कृत 'अँड्रॉईड फंडामेंटल डेव्हलपमेंट' या विषयावर विभाग सुधारणेअंतर्गत दोन वेळा कार्यशाळा घेतली आहे.

> **गुगल संस्थेशी करारामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळणार असून, त्यांच्या कौशल्यात भर पडणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गुगल संस्थेशी शिवाजी विद्यापीठ जोडले जाणे, ही कौतुकाची बाब आहे.**
> **- डॉ. डी. टी. शिर्के,**
> प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



यात गुगल संस्थेच्या तज्ज्ञांनी १०० हून अधिक प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले. संगणकशास्त्र विभागाने 'मास्टर्स इन कॉम्प्युटर सायन्स'मध्ये अँड्रॉईड प्रणालीच्या मूलभूत घटकांबाबत ६० तासांचा अभ्यासक्रमही सुरू केला आहे.

'गुगल'ने यासाठी व्हिडिओ प्रश्नपत्रिका, पुस्तकांसह आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिले आहे. पुढील टप्प्यात अँड्रॉईड प्रणालीबाबतच्या नवीन संशोधनासाठी अद्ययावत प्रयोगशाळा सुरू केली जाणार आहे. या माध्यमातून संगणकशास्त्रातील एक लाख ३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

-3 JAN 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मनुष्यकेंद्री विचारसरणीचे शिंदेंचे कार्य

## प्रा. पुष्पा भावे : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन - भाग २' ग्रंथाचे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : 'मनुष्यकेंद्री विचारसरणी हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. आज आपण ज्या विघटित स्वरूपात राहतो आहोत, त्या वेळी महर्षींचे हे विचारच आपल्याला नवी वाट दाखवतील,' असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व विचारवंत प्रा. पुष्पा भावे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षींच्या स्मृतिदिनानिमित्त रा. ना. चव्हाणलिखित 'विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन - भाग २' या ग्रंथाचे प्रकाशन आज विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर पुण्याच्या भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन- भाग २' या ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना प्रा. पुष्पा भावे. व्यासपीठावर उपस्थित डॉ. राजन गवस, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, रमेश चव्हाण, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सौ. सुजाता पवार, डॉ. गो. मा. पवार, अशोक शिंदे व डॉ. रणधीर शिंदे.

प्रा. पुष्पा भावे म्हणाल्या, "महर्षी शिंदे यांचे कार्य आणि विचार आजच्या स्थितीत अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांना देशामध्ये जे सामाजिक बदल अभिप्रेत होते, त्या दिशेने त्यांनी काम केले. ते आपल्या उद्दिष्टप्राप्तीच्या दिशेने कार्यरत राहिले. लोकांना एकत्र करून, चर्चा करून त्यांचे प्रश्न सोडविण्याची त्यांची भूमिका असे. अशा सुसंवादातून ते बदल घडवू पाहत होते. महर्षींची ही पद्धत आपण अंगीकारणे अत्यावश्यक आहे. महर्षी शिंदे यांनी अन्य कोणत्याही बाबीपेक्षा नेहमी विवेकाचा आवाज ऐकण्यास प्राधान्य दिले."

कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, "महर्षी शिंदे काळाच्या पुढे पाहणारे द्रष्टे विचारवंत होत. विचारांची स्पष्टता, निर्मळ सहृदयता या गुणांसह मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी त्यांनी कार्य केले." अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले, की अध्यासनाच्या वतीने पुढील वर्षभर महर्षींचे विचार व कार्य यांविषयी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात यावे.

महर्षींचे नातू निवृत्त एअर कमोडोर अशोक शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते ग्रंथाचे प्रकाशन झाले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, महर्षी शिंदे यांच्या नात सौ. सुजाता पवार, पणतू राहुल पवार, आनंद भावे, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. व्यंकाप्पा भोसले, डॉ. अरुण शिंदे, रमेश शिपूरकर, डॉ. टी. एस. पाटील, रमेश कोलवालकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

E 3 JAN 2018 महाराष्ट्र टाईम्स जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदेंचे विचार पथदर्शी

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'मनुष्यकेंद्री विचारसरणी हा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. आज आपण ज्या विघटित स्वरूपात राहतो आहोत, त्यावेळी महर्षींचे हे विचारच आपल्याला नवी वाट दाखवतील,' असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व विचारवंत प्रा. पुष्पा भावे यांनी केले.

**ज्येष्ठ विचारवंत प्रा. भावे यांचे प्रतिपादन**



**'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन- भाग २' ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना प्रा. पुष्पा भावे. सोबत डावीकडून, डॉ. एन. डी. पाटील, रमेश चव्हाण, डॉ. माणिकराव साळुंखे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सुजाता पवार, आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षींच्या स्मृतिदिनानिमित्त रा. ना. चव्हाण लिखित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : एक दर्शन, भाग-२' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ पुणे येथील भारती अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात हा कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

प्रा. भावे म्हणाल्या, 'शिंदे यांचा प्रवास कोणत्याही विशिष्ट विचारसरणीनुसार अथवा धर्मानुसार नव्हे, तर त्यांनी स्वत: ठरविलेल्या तत्त्वांनुसार झाला. भाषाशास्त्रासह धर्मशास्त्राचा तौलनिक अभ्यास त्यांनी केला. तथापि, एक धर्म पद्धती त्यांना अमान्य होती. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज अथवा ख्रिस्ती धर्म या प्रत्येक धर्मामधील चांगली मूल्ये त्यांनी उचलली आणि ती राबविण्यावर भर दिला. बाबासाहेबांच्या कार्यासाठी आवश्यक पार्श्वभूमी, पूर्वतयारी करण्याचे कार्य महर्षींनी केले.'

कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले, 'महर्षी शिंदे हे काळाच्या पुढे पाहणारे द्रष्टे विचारवंत होते. त्यांच्याविषयीच्या ग्रंथातून समाज इतिहासाचा एक आदर्श वस्तुपाठ प्रदर्शित झाला आहे.'

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, 'अध्यासनाच्यावतीने पुढील वर्षभर महर्षींचे विचार व कार्य याविषयी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात यावे, त्याचप्रमाणे त्यांच्या ७५व्या स्मृतिदिनी वाईमध्येही एखादे चिंतन शिबिर आयोजित करण्याबाबत विचार करावा.'

यावेळी डॉ. गो. मा. पवार यांच्यासह ग्रंथाचे संपादक रमेश चव्हाण, महर्षींचे नातू निवृत्त एअर कमांडर अशोक शिंदे यांनी मनोगत व्यक्त केली. डॉ. राजन गवस यांनी स्वागत केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला, तर डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, महर्षी शिंदे यांच्या नात सुजाता पवार, पणतू राहुल पवार, आनंद भावे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. अशोक चौसाळकर आदी उपस्थित होते.

3 JAN 2018
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## बी. पी. साबळे : शिवाजी विद्यापीठात ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम

# अप्पासाहेब पवार यांचे योगदान प्रेरणादायी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** उत्तम प्रशासक, इतिहास संशोधक, शिक्षणतज्ज्ञ म्हणून काम करुन. डॉ. अप्पासाहेब पवार यांनी शिवाजी विद्यापीठाचा लौकिक वाढविला. त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. बी. पी. साबळे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात 'डॉ. अप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी'तर्फे डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या ३६ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.



शिवाजी विद्यापीठातील डॉ. अप्पासाहेब पवार 'कमवा व शिका प्रबोधिनी'तर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. बी. पी. साबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी जे. एफ. पाटील, आनंदा पाटील, बी. एल. पाटील, एस. जे. नाईक, डी. टी. शिर्के, आदी उपस्थित होते.

माजी कुलगुरु डॉ. साबळे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून सूत्रे हाती घेताच डॉ. अप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आणि पारदर्शी कारभार करुन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे म्हणून त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

प्र-कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या प्रशासकीय कार्यपद्धतीवर संशोधनात्मक काम होण्याची आवश्यकता आहे. डॉ. पवार यांच्यामुळे विद्यापीठाचा लौकिक राष्ट्रीय पातळीवर वाढला. कार्यक्रमास डॉ. जे. एफ. पाटील, आनंद पाटील, अनुराधा गुरव, जी. पी. माळी, सी. ए. भोसले, मानसिंग जगताप, डॉ. कोळेकर, अशोक साबळे, आदी उपस्थित होते. बी. एल. पाटील यांनी प्रास्ताविक केले. एस. जे. नाईक यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. तुकाराम सरगर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
लोकमत

# आप्पासाहेब पवार यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त येथील अतिथीगृहासमोरील व विद्यार्थी भवन येथील डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यास, तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पोर्चमध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. तुकाराम सरगर, डॉ. मानसिंग जगताप, डॉ. अशोक साबळे, इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. सी. ए. लंगरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, पी. टी. गायकवाड, डॉ. पी. व्ही.अनभुले, डॉ. एम. निंबाळकर उपस्थित होते.

- 3 JAN 2018

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी कल्याण मंडळ निवडी २७ फेब्रुवारीला

## कार्यक्रम जाहीर : २४ जानेवारीला महाविद्यालयीन सचिवपदाची निवड

सकाळ वृत्तसेवा


कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळाच्या (स्टुडंट कौन्सिल) अध्यक्ष व सचिवपदाची निवडणूक २७ फेब्रुवारीला होणार आहे. महाविद्यालयीन सचिवपदाची निवड २४ जानेवारीला होणार असून, त्याबाबतचा निवडणूक कार्यक्रम आज जाहीर झाला, पण पदाधिकाऱ्यांना केवळ तीनच महिने कारभार करायला मिळणार आहे. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वात कमी कालावधीचे अध्यक्ष व सचिव निवडले जाणार आहेत.

यंदाचे महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून, विद्यार्थ्यांत महाविद्यालयीन सचिवपदाच्या निवडीबाबत उत्सुकता आहे. काही महाविद्यालयांत महाविद्यालयीन सचिव, महिला प्रतिनिधींसह विद्यापीठ सचिव निवडले जातात. दरवर्षीप्रमाणे



निवडणुकीच्या प्रतीक्षेत संपली टर्म

विद्यार्थी कल्याण मंडळ : नियमाचे कारण देत विद्यापीठ प्रशासनाने केले हात वर



विद्यापीठ प्रशासनातर्फे मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, येत्या काही दिवसांत निवडणुकीत रंग भरेल. महाविद्यालयीन सचिवपदाच्या निवडणुकीपासून ते विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्ष व सचिवपदाकरिता जोरदार फिल्डिंग लावली जाईल.

### विद्यापीठस्तरीय विद्यार्थी कल्याण मंडळ

- महाविद्यालयीन सचिवांचे अर्ज सादर : १ फेब्रुवारी २०१८
- निवड समितीची बैठक : २ फेब्रुवारी
- मतदार यादी, नामांकनप्राप्त विद्यार्थ्यांची यादी व निवडणुकीची घोषणा : ५ फेब्रुवारी
- अंतिम यादी जाहीर : ६ फेब्रुवारी
- मंडळ अध्यक्ष व सचिवपदासाठी निवडणूक : २७ फेब्रुवारी

### विद्यापीठ अधिविभागस्तरीय विद्यार्थी मंडळ

- नामांकन अर्ज दाखल : १० जानेवारी
- अर्जांची छाननी व महिला प्रतिनिधींसाठी नामांकन : ११ जानेवारी
- मंडळाचे गठन व यादी जाहीर : १५ जानेवारी
- माघारीची मुदत : १६ जानेवारी
- मंडळाच्या सचिवपदासाठी निवडणुकीची घोषणा : १७ जानेवारी
- सचिवपदासाठी निवडणूक : २४ जानेवारी

### महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळ

- अर्ज सादर : १० जानेवारी
- माघारीची मुदत : १६ जानेवारी
- सचिवपदासाठी निवडणूक घोषणा : १७ जानेवारी
- सचिवपदासाठी निवडणूक : २४ जानेवारी

- 3 JAN 2018
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टुडंट कौन्सिल निवडणूक कार्यक्रम जाहीर

## राज्यपालांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक वर्ष २०१७–१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात याव्यात, असा अध्यादेश राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी रविवारी काढला. त्यामुळे यंदा राज्यभरातील विद्यापीठांच्या 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका' मेरीटनुसारच होणार आहेत. ही निवडणूक प्रक्रिया २८ फेब्रुवारीपूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ 'स्टुडंट कौन्सिल निवडणूक' कार्यक्रम मंगळवारी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

महाविद्यालयीन निवडणुक प्रक्रिया गुरूवारपासून सुरू होणार असली तरी आठ दिवसांनी महाविद्यालय पातळीवर विद्यार्थी प्रतिनिधीची निवड केली जाणार आहे. तर जानेवारी अखेरीस



निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ ची अंमलबजावणी १ मार्चपासून सर्वच विद्यापीठांनी केली आहे. 'स्टुडंट कौन्सिल निवडणुका' झाल्यानंतर तयार होणाऱ्या स्टुडंट कौन्सिलच्या अध्यक्षपदी कुलगुरू तर सभापतीपदी विद्यार्थी विकास संचालक असणार आहेत. प्राचार्य, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण, राष्ट्रीय छात्र सेना, सांस्कृतिक विभागातील प्रत्येकी एक नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यपदी असणार आहे. यापैकी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विद्यार्थीनी प्रतिनिधी अशा पध्दतीने प्रत्येकी एक जागा राखीव ठेवण्यात येणार आहे.

### महाविद्यालय स्तरावरील स्टुडंट कौन्सिल निवडणूक

दि. १०–महाविद्यालय व अधिविभागातील वर्गप्रतिनिधीचे अर्ज विद्यापीठाकडे दाखल करणे, दि. ११–प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया, दि. १५–वर्गप्रतिनिधींनी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीसाठी' अर्ज भरावयाचा आहे, दि. १६–स्टुडंट कौन्सिल प्रतिनिधीची अंतिम यादी जाहीर, दि. १७–महाविद्यालय पातळीवरील सचिवपदाच्या अर्जांची अंतिम यादी जाहीर होणार, दि. २४–महाविद्यालयीन पातळीवरील 'स्टुडंट कौन्सिल सचिवपदाची निवडणूक होणार आहे.

### विद्यापीठ अधिविभाग स्तरावरील निवडणूक

१ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील सचिवपदासाठी अर्ज दाखल करावयाचा आहे, २ फेब्रुवारी रोजी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूक' निवड समितीची बैठक, ५ फेब्रुवारी कुलगुरू नियुक्त विद्यार्थ्यांची नावे जाहीर होणार, विद्यापीठ पातळीवरील सचिव पदासाठीच्या स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीसाठी नोटीस दिली जाणार., २७ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील अध्यक्ष व सचिवपदासाठी निवडणुक.

3 JAN 2018 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळाच्या निवडी उद्यापासून

## तीन वर्षांनंतर प्रक्रिया : सचिवपदासाठी २४ जानेवारीला निवडणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाविद्यालयीन, शिवाजी विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या सन २०१७-१८ च्या निवडणुकीचा कार्यक्रम मंगळवारी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी जाहीर केला. दि. २८ नोव्हेंबर २०१७ च्या शासन आदेशानुसार गुणवत्तेच्या आधारावर या निवडणुका होणार आहेत. त्यात महाविद्यालयीन व विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदासाठी दि. २४ जानेवारीला निवडणूक होणार आहे. त्यासाठीच्या प्रक्रियेचा प्रारंभ उद्या, गुरुवारपासून होणार आहे.



तीन वर्षांनंतर विद्यार्थी मंडळाच्या निवडीची प्रक्रिया होणार आहे. या प्रक्रियेअंतर्गत महाविद्यालय आणि विद्यापीठ अधिविभाग विद्यार्थी मंडळावरील विद्यार्थी प्रतिनिधीपदासाठी अर्ज करण्याची मुदत दि. १० जानेवारीपर्यंत, तर विद्यार्थिनी प्रतिनिधीपदासाठी अर्ज करण्याची मुदत दि. ११ जानेवारीपर्यंत आहे. माघारीची मुदत दि. १६ जानेवारीपर्यंत आहे. माघारीनंतर राहणाऱ्या उमेदवारांना नोटीस आणि सचिवपदाच्या निवडणुकीची घोषणा १७ जानेवारीला होईल. त्यानंतर २४ जानेवारीला सचिवपदासाठी निवडणूक होईल. विद्यापीठ विद्यार्थी मंडळावरील सचिवपदासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत दि. १ फेब्रुवारीपर्यंत आहे. दि. २ फेब्रुवारीला निवड समितीची बैठक होणार आहे. विद्यापीठ विद्यार्थी मंडळासाठीच्या निवडणुकीची घोषणा दि. ६ फेब्रुवारीला होईल. यानंतर अध्यक्ष आणि सचिवपदासाठी दि. २७ फेब्रुवारीला निवडणूक होणार आहे, अशी माहिती डॉ. गुरव यांनी दिली.

### प्रतीक्षेत सरली दोन वर्षे

विद्यापीठाचे विद्यार्थी मंडळ हे सन २०१४ मध्ये कार्यरत होते. यानंतर विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाने २०१५-१६ च्या निवडणुकीचा कार्यक्रम ३० जुलै २०१५ रोजी जाहीर केला. 'महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४'नुसार गुणवत्तेच्या आधारावर या निवडणुका होणार होत्या. मात्र, काही अपरिहार्य कारणामुळे या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती दिली असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने जाहीर केले. यानंतर नवीन विद्यापीठ कायद्याच्या अंमलबजावणीची कार्यवाही, निवडणुकांसाठी परिनियमाच्या उपलब्धतेची प्रतीक्षा या कारणांमुळे या मंडळाची निवडणूक लांबणीवर पडली. यामध्ये दोन वर्षे सरली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठ स्टुडंट कौन्सिलची २७ फेब्रुवारीला निवडणूक

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाच्या (स्टुडंट कौन्सिल) अध्यक्ष आणि सचिवपदासाठीची निवडणूक मंगळवारी जाहीर झाली. निवडणूक प्रक्रियेत विद्यापीठाच्या अध्यक्ष आणि सचिव पदांची निवडणूक २७ फेब्रुवारीला, तर महाविद्यालयीन सचिवपदाची निवड २४ जानेवारीला होणार आहे.

काही महाविद्यालयांत महाविद्यालयीन सचिव, महिला प्रतिनिधींसह विद्यापीठ सचिव निवडले जातात. दरवर्षीप्रमाणे विद्यापीठ प्रशासनातर्फे मंडळाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. महाविद्यालयीन सचिवपदाच्या निवडणुकीपासून ते विद्यार्थी कल्याण मंडळाच्या अध्यक्ष व सचिव पदांसाठी जोरदार फिल्डिंग लावली जाणार आहे.

**विद्यापीठस्तरीय निवडणूक कार्यक्रम**

■ महाविद्यालयीन सचिवांचे अर्ज सादर : १ फेब्रुवारी ■ निवड समितीची बैठक : २ फेब्रुवारी ■ मतदार यादी, नामांकनप्राप्त विद्यार्थ्यांची यादी जाहीर व निवडणुकीची घोषणा : ५ फेब्रुवारी ■ अंतिम यादी जाहीर : ६ फेब्रुवारी ■ मंडळाच्या अध्यक्ष व सचिव पदांसाठी निवडणूक : २७ फेब्रुवारी ■ विद्यापीठ अधिविभागस्तरीय विद्यार्थी मंडळ ■ नामांकन अर्ज दाखल : १० जानेवारी ■ अर्जांची छाननी व महिला प्रतिनिधींसाठी नामांकन : ११ जानेवारी ■ मंडळाचे गठन व यादी जाहीर : १५ जानेवारी ■ माघारीची मुदत : १६ जानेवारी ■ मंडळाच्या सचिवपदासाठी निवडणुकीची घोषणा : १७ जानेवारी ■ सचिवपदासाठी निवडणूक : २४ जानेवारी ■ महाविद्यालयीन विद्यार्थी मंडळ ■ अर्ज सादर : १० जानेवारी ■ माघारीची मुदत : १६ जानेवारी ■ सचिवपदासाठी निवडणूक घोषणा : १७ जानेवारी ■ सचिवपदासाठी निवडणूक : २४ जानेवारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'नेट सेट'साठी अभ्यासात सातत्य

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

नेट व सेटसारख्या परीक्षेमध्ये यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात कायम सातत्य ठेवणे गरजेचे आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा डॉ. डी. टी शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित दोनदिवसीय सेट -नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'स्पर्धात्मक युगात कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी विद्यार्थ्यांनी ठेवली पाहिजे. पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकत असतानाच अशा सेट-नेट परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांनी केल्यास यशस्वी होता येईल. दूर शिक्षण केंद्राचा सेट-नेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या फायद्याचा ठरेल अशा कार्यशाळामधून दूर शिक्षण केंद्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत आहे.'



पहिल्या सत्रात बोलताना रसायनशास्त्र विभागाचे प्रा डॉ. गजानन राशिंगकर म्हणाले, 'सकारात्मक दृष्टिकोन व कष्टाची तयारी ठेवल्यास विद्यार्थ्यांना सेट-नेट परीक्षा उत्तीर्ण होणे अवघड नाही.' त्यानंतर दुपारच्या सत्रामध्ये डॉ. के. बी. पाटील, डॉ शशिकांत अन्नदाते व राहुल चित्रकार यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेसाठी सांगली, सातारा कोल्हापूर, सोलापूर, बेळगाव, जिल्ह्यातून दोनशेहून अधिक विद्यार्थी सहभागी होते. दूर शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी प्रास्ताविक केले. उपकुलसचिव कॅप्टन डॉ. एन. पी. सोनजे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
लोकमत

# विधी अधिविभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागातर्फे मानवशास्त्र सभागृहात प्राचार्य एस. व्ही. आपटे व्याख्यानमालेअंतर्गत 'न्यायालयीन कृतिवाद व न्यायालयीन संयम : एक काळाची गरज' या विषयावर व्याख्यान झाले.

न्यायमूर्ती यू. के. चंदिवाल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शहाजी लॉ कॉलेजचे डॉ. प्रवीण पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन कृतिवाद आणि भारतीय राज्यघटना या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर प्रश्नउत्तराचा कार्यक्रम झाला. विभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजन अभिजित शितोळे, अमिता बंड, रेश्मा नायकवडी, अमर शिपेकर, काजल कांबळे या विद्यार्थ्यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
सकाळ

# विद्यापीठात आज अंदाजपत्रकावर परिसंवाद

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनातर्फे 'अंदाजपत्रक २०१८ अपेक्षा' या विषयावर उद्या (ता. ३) परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामध्ये सकाळी १० वाजता हा कार्यक्रम होणार आहे. त्यात गोवा येथील डॉ. अनिल पडोशी तसेच डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. रजपूत, कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स यांचा सहभाग असणार आहे. हे चर्चासत्र सर्वांसाठी खुले असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बँक ऑफ इंडिया अध्यासनाचे समन्वयक डॉ. व्ही. बी. काकडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018

लोकमत

# 'अंदाजपत्रक अपेक्षा' आज परिसंवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनामार्फत 'अंदाजपत्रक २०१८ : अपेक्षा' या विषयावर आज, बुधवारी सकाळी दहा वाजता राष्ट्रीय परिसंवाद होणार आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामध्ये याचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादामध्ये डॉ. अनिल पडोशी, जे. एफ. पाटील, डॉ. रजपूत यांच्यासह कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशन, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग असणार आहे, अशी माहिती समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018

महाराष्ट्र टाईम्स

थोडक्यात

## शिवाजी विद्यापीठात आज राष्ट्रीय परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनामार्फत 'अंदाजपत्रक २०१८... अपेक्षा' या विषयावर बुधवारी (ता.३) सकाळी दहा वाजता राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागात होणाऱ्या या चर्चासत्रामध्ये गोवा येथील तज्ज्ञ डॉ. अनिल पडोशी, डॉ. जे. एफ. पाटील, मार्गदर्शन करणार आहेत. कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स यांचा सहभाग या उपक्रमात असणार आहे. हे चर्चासत्र सर्वांसाठी खुले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठात आज राष्ट्रीय परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया अध्यासनामार्फत ३ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभागामध्ये चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्रामध्ये डॉ. अनिल पडोशी, डॉ. जे. एफ. पाटील, कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स आदी सहभागी आहेत. चर्चासत्र सर्वांसाठी खुले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 JAN 2018
लोकमत

# युनिव्हर्सिटी स्टुडंट असोसिएशनतर्फे निदर्शने

कोल्हापूर : मराठी शाळा बंद करण्याच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी युनिव्हर्सिटी स्टुडंट असोसिएशनतर्फे उद्या, गुरुवारी दुपारी साडेबारा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली जाणार आहेत, अशी माहिती असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष प्रवीण वाघमारे यांनी दिली.